आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.००वाजता
१९ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- मराठा आरक्षणाबाबत निर्णय होऊ देत नसल्याचा आरोप खरा ठरला तर पद आणि राजकारणही सोडण्याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची तयारी, तर हे आरोप चुकीचे आणि तथ्यहीन असल्याचा मुख्यमंत्र्यांचा निर्वाळा

- नागपूरचं नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आणि मॉरिशस सरकार यांच्यात सामंजस्य करार

- राज्यात सर्वत्र रक्षाबंधन आणि नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा

- पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील साहित्य आणि कलागौरव पुरस्कार सोहळ्यात जेष्ठ साहित्यिक प्रेमानंद गज्वी जीवनगौरव पुरस्कारानं सन्मानित

**आणि**

- माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं निधन

**<><><><><>**

मराठा आरक्षणाबाबत निर्णय घेऊ देत नसल्याचा मनोज जरांगे पाटील यांचा आरोप उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी फेटाळला आहे. मराठा आरक्षण तसंच सगेसोयऱ्यांच्या मुद्दयावर मुख्यमंत्री शिंदे यांना काम करायचं आहे, निर्णय घ्यायचा आहे मात्र त्यांना देवेंद्र फडनवीस काम करू देत नसल्याचा आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला होता. त्यावर फडनवीस यांनी आज बातमीदारांशी बोलताना उत्तर दिलं. मराठा समाजासाठी आजपर्यंत जे काही निर्णय झाले ते एक तर मी केले, किंवा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या पाठीशी मी ठामपणे उभा राहिलो आहे, त्यांना पाठबळ दिले आहे. मात्र, मनोज जरांगे पाटील हे जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करत असल्याचं फडनवीस यांनी म्हटलं आहे. जरांगे-पाटील यांनी

मुख्यमंत्र्यांना याबाबत विचारावं, मराठा आरक्षणाकरिता कुठलाही निर्णय घ्यायचा त्यांनी प्रयत्न केला आणि तो थांबवला, असं त्यांनी सांगितलं तर त्या क्षणी माझ्या पदाचा राजीनामा देईन आणि राजकारणातून देखील निवृत्त होईन, असं फडनवीस म्हणाले.

दरम्यान फडनवीस यांच्यावरचे आरोप चुकीचे आणि तथ्यहीन असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं आहे. फडनवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यामुळे ते मराठा समाजाला विरोध करतात, हा आरोप पुर्णपणे चुकीचा आहे. आम्ही सर्वजण एकत्रितपणे निर्णय घेतो, असं शिंदे यांनी सांगितलं.

<><><><><>

नागपूरच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आणि मॉरिशस सरकार यांच्यात आज मुंबईत सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. मॉरिशसचे केंद्रीय मंत्री ॲलन गानू आणि महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या.

या करारानुसार मॉरिशसमधील कर्करोग रुग्णांना नागपुरातील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्युट आंतरराष्ट्रीय दर्जाची वैद्यकीय सेवा दिली जाईल. तसंच तिथल्या रुग्णालयांमधल्या आरोग्य कर्मचारी, परिचारिकांना प्रशिक्षणाची जबाबदारी या इन्स्टिट्युटला दिली आहे. या करारामुळे महाराष्ट्र आणि मॉरिशसचे संबंध आणखी सुदृढ होतील, असं ॲलन गानू यांनी सांगितलं. या करारामुळे महाराष्ट्र आणि मॉरिशसच्या संबंधात नागपूरचा आणखी एक नवा आयाम जोडला जात असल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आनंद व्यक्त केला.

<><><><><>

राज्यात रक्षाबंधनाचा सण उत्साहानं साजरा होत आहे. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या विविध रंग आणि आकाराच्या राख्यांबरोबरच सामाजिक सद्भावनेचा,

पर्यावरण रक्षणाचा संदेश देणाऱ्या राख्याही वापरल्या जात आहेत. विविध राजकीय पक्ष आणि संघटनांनी आज रक्षाबंधनाचे कार्यक्रम आयोजित केले.

रक्षाबंधनानिमिमत्त विविध सामाजिक सांस्कृतिक आणि धार्मिक संस्थांच्या प्रतिनिधींनी राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची राजभवन मुंबई येथे भेट घेऊन त्यांना राखी बांधली. यावेळी राज्यपालांनी सर्वांना रक्षा बंधनाच्या शुभेच्छा दिल्या. **पालघर** जिल्ह्यातल्या 'सेवा विवेक' ग्राम विकास केंद्रामधल्या, आदिवासी बांबू महिला कारागिरांनी राज्यपालांना बांबूपासून तयार केलेली पर्यावरण स्नेही राखी बांधली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी आयोजित कार्यक्रमात माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांनी मुख्यमंत्र्यांना राखी बांधली. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यात जमा झालेले पैसे लाभार्थ्यांशिवाय अन्य कुणालाही काढता येणार नाही असं त्यांनी स्पष्ट केलं. यावेळी मुख्यमंत्री उपस्थित महिलांशी संवाद साधला. राज्याची आर्थिक ताकद वाढत जाईल तसे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतली निधीची रक्कम वाढवण्याचा मानस असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. उमेद अभियानातल्या महिलांच्या अडचणी सोडवण्यासाठी लवकरच विशेष बैठक घेण्याचं आश्वासन त्यांनी दिलं.

देशाचं रक्षण करण्यासाठी सीमेवर अहोरात्र पहारा देणाऱ्या वीर जवानांसाठी **नंदुरबार**च्या आदिवासी भागात राहणाऱ्या शालेय विद्यार्थिनींनी टपालानं राख्या पाठवल्या. टाकाऊ पदार्थांपासून आश्रमशाळेतल्या विद्यार्थिनींनी स्वतः या राख्या तयार केल्या आहेत.

**सांगलीच्या** सुंदर नगर इथं रक्षाबंधन सोहळ्यात महापालिका आयुक्तांना सेक्स वर्कर महिलांनी राख्या बांधल्या.

**नागपूरच्या** विदर्भ आदिवासी विद्यार्थी वसतिगृहात रक्षाबंधन सोहळा आयोजित करण्यात आला होता. टाकाऊ पदार्थांपासून राख्या तयार करण्याची स्पर्धा यावेळी आयोजित करण्यात आली होती.

रक्षाबंधनानिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज शालेय विद्यार्थ्यांनी राख्या बांधल्या.

**<><><><><>**

राज्यात आज नारळी पौर्णिमा उत्साहानं साजरी होत आहे. कोळी बांधवांसाठी आपल्या मासेमारीचा नवा हंगाम सुरु करण्याचा हा दिवस. पावसाळ्यात खवळलेल्या समुद्राला शांत होण्याची प्रार्थना करुन आणि नारळ अर्पण करुन  होड्या समुद्रात लोटण्याची प्रथा आहे. या निमित्तानं किनारपट्टीवरच्या कोळी वसाहतींमधे विविध कार्यक्रम आयोजित केले होते.

**मुंबईतल्या** जुहू, वेसावे, खारदांडा, मढ, मालवणी, गोराई, माहुल, वरळी आदी कोळीवाड्यांमध्ये नारळी पौर्णिमा साजरी करण्यात येत आहे. नारळी पौर्णिमेनिमित्त कोळीवाडे सजले असून दारासमोर रांगोळ्या काढल्या आहेत. कोळी बांधव सामूहिकपणं पारंपारिक पद्धतीनं मिरवणूकीत वाजत गाजत नारळाच्या पालख्या काढतात. नारळी पौर्णिमेनिमित्त वरळीमध्ये नारळ फोडण्याच्या स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**नवी मुंबईतल्या** दिवाळे गाव, करावे गाव, सारसोळे गाव, वाशी गाव, सानपाडा, तळवली, दिवागाव, ऐरोली इथल्या कोळीवाड्यांमध्ये नारळी पौर्णिमेचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. पामबीच मार्गालगत असलेल्या सारसोळे जेट्टी परिसरात पालखी मिरवणूक काढण्यात आली.

**ठाणे, कल्याण, सातपाटी** इत्यादी ठिकाणीही समुद्र किंवा खाडीकिनारी नारळी पौर्णिमेनिमित्त जत्रा भरल्या आहेत.

<><><><><>

सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील यांच्या स्मरणार्थ दिल्या राज्यस्तरीय साहित्य आणि कलागौरव पुरस्काराचं वितरण आज अहमदनगरमधे करण्यात आलं. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे नवनियुक्त अध्यक्ष रविंद्र शोभणे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पुरस्काराचं हे ३४ वे वर्ष असून, यंदा जेष्ठ साहित्यिक आणि विचारवंत प्रेमानंद गज्वी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. कानपूर इथले समीर चव्हाण यांच्या ‘अखई ते जाले या ग्रंथाला उत्कृष्ट साहित्य कृतीचा पुरस्कार मिळाला. हसन शेख पाटेवाडीकर यांना कलेच्या सेवेबद्दल पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील कलागौरव पुरस्कार , तर नाटककार अभिनेता प्राजक्त देशमुख यांना नाट्यसेवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.

यावेळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><><>

माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं आज चेन्नईत निधन झालं.ते ८३ वर्षांचे होते. देहरादूनचं राष्ट्रीय भारतीय लष्करी महाविद्यालय आणि पुण्याजवळ खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत त्यांचं शिक्षण झालं होतं. त्यांनी अनेक महत्वपूर्ण आघाड्यांवर सैन्याचं नेतृत्व केलं होतं तसंच अनेक युद्धांमध्ये कामगिरी केली होती. पद्मनाभन यांनी काही पुस्तकांचही लिखाण केलं होतं.

<><><><><>

आज रक्षाबंधन हा सणाचं उत्साही वातावरण आहे तर दुसरीकडे या वर्षातली महत्त्वाची खगोलीय घटना घडणार आहे. ही घटना म्हणजे ब्ल्यू सुपर मून. संध्याकाळी ६ वाजून ५४ मिनिटांनी चंद्रोदय झाल्यानंतर काही वेळानं ब्ल्यू सुपर

मून बघता येईल. पुढचे दोन दिवस साध्या डोळ्यांनी हा सुपर ब्ल्यू मून बघता येणार आहे.

ब्ल्यू सुपर मूनच्या दिवशी चंद्र हा नेहमी पौर्णिमेला उगवणाऱ्या चंद्रापेक्षा अधिक मोठा दिसणार आहे. चंद्र पृथ्वीच्या अधिक जवळ येणार असल्यानं त्याचा प्रकाश नेहमीपेक्षा ३० टक्क्यांहून अधिक प्रखर आणि आकारही १४ टक्क्यांहून अधिक असणार आहे. ही घटना अत्यंत दुर्मिळ समजली जात असल्यानं खगोलप्रेमी आणि अभ्यासकांत मोठी उत्सुकता आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी जोरदार पाऊस पडला. मराठवाड्यात काही ठिकाणी तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी, तर कोकण, मराठवाडा आणि विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पड्ण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**